

**समाजप्रबोधनासाठी ठिकठिकाणी पथनाट्यं सादर केली जातात. परंतु या पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करणारी तरुणमंडळी खरोखरच स्वत:पासून या प्रबोधनाची सुरुवात करतात का, हे जाणून घेण्याचा हा प्रयत्न.**

# दादा आवर... दादा सावर...

'मुली चुगली करतात. मुलींनी तोकडे कपडे घातले की मुलं चिडवणारंच. कन्यादान वगैरे धार्मिक विधी योग्यच आहेत, असं मला पूर्वी वाटायचं. परंतु 'रोडसाइड रोमियोंचा सुळसुळाट' हे पथनाट्य सादर करू लागलो आणि मुलींचा आदर करायला शिकलो'

- गणेश जाधव,
टीवायबीए, डॉ. टी.के.टोपे कॉलेज

"मी पूर्वी मुलींचं ऐकूनच घ्यायचो नाही. मीच नेहमी बरोबर आहे, असं मला वाटायचं. कदाचित लहानपणापासूनचा पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री दुय्यम हा पगडा त्याला कारणीभूत असावा. मीही अन्य मुलांसोबत मुलींबद्दल कमेंट पास करायचो. परंतु पथनाट्यं करू लागलो आणि बदललो. आता मी मुलींना आदर द्यायला शिकलोय.'

- विप्लव गायकवाड,
एफवायबीए, रुईया कॉलेज

ही दोन मुलं शिकली. ती मुलं चौघांना शिकवतील. या चारजणांमधून ४०० जण शिकतील. समाजप्रबोधनाचा हा प्रवाह असा अखंड वाहत राहील आणि त्याला माध्यम असेल पथनाट्य.

*मर्दपणा तुझा हा बोकाळला फार रं*
*वस्तू नाही बाई, जरा मोल तिचं जाण रं*
*आवर दादा रं, सावर दादा रं*

महिलांच्या होणाऱ्या छेडछाडीविरोधात आवाज उठवण्यासाठी तसेच केवळ महिलांच्या लढण्यासाठी प्रवृत्त न करता पुरुषांचीही मानसिकता बदलण्यासाठी पथनाट्याच्या माध्यमातून ही तरुणमंडळी साद घालत आहेत आणि त्यासाठी त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचं व्यासपीठ निवडलं आहे.

मावा (मेन अगेन्स्ट व्हायोलन्स अँड अब्युज) या सेवाभावी संघटनेच्या पुढाकाराने रुईया, रुपारेल, कीर्ती, सिद्धार्थ, गुरुनानक आणि डॉ. टी. के. टोपे नाइट कॉलेजच्या एनएसएस युनिटच्या सुमारे ३१ मुलांनी एकत्रितपणे हे पथनाट्य बसवलं आहे. परंतु दुसऱ्याला शिकवण्याआधी चांगल्या वर्तणुकीचा धडा या मुलांनी सर्वप्रथम गिरवला आहे. विशेष म्हणजे हे पथनाट्य या मुलांनीच एकत्र बसून, आजूबाजूला दिसलेल्या घटना टिपून अवघ्या चार दिवसांत बसवलंय. विशेष म्हणजे या पथनाट्यातही मुलींपेक्षा मुलांचीच संख्या जास्त आहे. 'मावा'चे सचिव हरिष सदानी, तसेच राजू इनामदार यांचे मार्गदर्शन लाभल्याचं ही मुलं आवर्जून सांगतात.

'आसाममध्ये पार्टीहून परतताना झुंडीने मुलीवर केलेले अत्याचार तसेच गेल्या वर्षी अंधेरीतल्या घटनेत मैत्रिणीची [illegible] काढणाऱ्यांना समज देणाऱ्या दोघा मित्रांचा गेलेला जीव.. या घटना म्हणजे ईव्ह टीझिंगने धारण केलेलं अक्राळविक्राळ रूपच. त्यामुळेच यंदाच्या गणेशोत्सवात याच विषयावर पथनाट्य सादर करून जनजागृती करण्याचा निर्णय आम्ही घेतला', अशी माहिती हरिष सदानी यांनी दिली. यातलं 'रोडसाइड रोमियोंचा सुळसुळाट' हे पथनाट्य कॉलेजांमध्ये तसेच विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये सादर केली जाणार आहेत.

- कॉलेज क्लब टीम